# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.10.2024** **वारःसोमवार**

---

वाराणसीमध्ये 6 हजार 700 कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाद्वारे 99 उमेदवारांची पहिली यादी जाहीर

काश्मीर खोऱ्यात प्रथमच आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनचं आयोजन

महिलांचा टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व करंडक न्यूझीलंडनं उंचावला आणि

बंगालच्या उपसागरात बुधवारपर्यंत चक्रीवादळ तयार होण्याचा इशारा

आता सविस्तर बातम्या

**<u>पंप्र- वाराणसी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी या आपल्या संसदीय मतदारसंघात 6 हजार 700 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची काल पायाभरणी आणि उद्घाटन केलं. शिक्षण, कौशल्य विकास, क्रीडा, आरोग्यसेवा आणि पर्यटन यासह इतर क्षेत्रांशी संबंधित या विकास प्रकल्पांमुळं वाराणसीतल्या लोकांचं जीवनमान सुधारेल तसंच तरुणांसाठी रोजगाराच्या संधीही निर्माण होतील असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

सारनाथमधील बौद्ध धर्माशी संबंधित क्षेत्राच्या पर्यटन विकास कामांचं उद्घाटनही पंतप्रधानांनी केले. बाणासूर मंदिर आणि गुरुधाम मंदिरात पर्यटन विकास कामं आणि उद्यानांचं सुशोभीकरण आणि पुनर्विकास यासारखे अनेक उपक्रमही त्यांनी सुरू केले.

**<u>नड्डा</u>**

सर्वांना उच्च दर्जाच्या आणि परवडणाऱ्या आरोग्य सुविधा सुनिश्चित करण्यासाठी सरकार आवश्यक ती पावले उचलत असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी म्हटलं आहे. बिहार आणि झारखंड वैद्यकीय मंचाच्या परिषदेला काल नवी दिल्लीत संबोधित करताना, नड्डा यांनी सरकार सर्वसमावेशक, प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि पुनर्वसनाची काळजी घेणारं आरोग्य धोरण लागू करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं सांगितलं.

**<u>मांडवीय-ईश्रम</u>**
कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविय असंघटित कामगारांसाठी ईश्रम, या सर्वसामावेशक संकेतस्थळाचा नवी दिल्लीत आरंभ करतील. असंघटित कामगारांना विविध सरकारी योजनांचा लाभ सहज घेता यावा यासाठी हे संकेतस्थळ काम करेल. सर्व सामाजिक सुरक्षितता आणि असंघटित कामगारांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांच्या लाभार्थ्यांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करणे हा या उपक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे.

**<u>भू-अभिलेख</u>**
केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान नागरी भूमी अभिलेखांसाठी सर्वेक्षणसंबंधी आधुनिक तंत्रज्ञानावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचं आज नवी दिल्लीत उद्घाटन करतील. शहरी भू-अभिलेख आधुनिकीकरणातील जागतिक सर्वोत्तम पद्धतींचं सादरीकरण, लागू करण्यायोग्य तांत्रिक उपाय आणि निवडक शहरी भागांसाठी पथदर्शी प्रकल्प नियोजन सुलभ करणं हा या कार्यशाळेचा उद्देश आहे.

**<u>यादी</u>**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आपल्या 99 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून, तर महाराष्ट्र भाजपाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कामठीमधून पक्षाचे उमेदवार असतील. भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीनं उमेदवारांच्या नावांना मंजुरी दिली.

पुढील महिन्याच्या २० तारखेला एकाच टप्प्यात २८८ सदस्य असलेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**<u>झारखंड</u>**
झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी, I.N.D.I.A. अंतर्गत झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसमध्ये 70 जागा वाटून घेतल्या जातील. तर 11 जागा आरजेडी आणि सीपीआय-एमएलला देण्यात येणार आहेत.

**<u>बिहार</u>**

बिहारमध्ये विरोधी महाआघाडीने चार विधानसभा जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. जागावाटपाच्या सूत्रानुसार आरजेडी इमामगंज, बेलागंज आणि रामगढ जागा लढवणार आहे तर सीपीआय-एमएल तरारी जागा लढवणार आहे.
दुसरीकडे एनडीएनेही पोटनिवडणुकीच्या चारही जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. बेलागंजमधून JD(U) आणि इमामगंजमधून हिंदुस्थानी अवाम मोर्चा निवडणूक लढवणार आहे. काल भाजपने तरारी आणि रामगड विधानसभा मतदारसंघांसाठी उमेदवार जाहीर केले होते.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...

**युद्ध**
उत्तर गाझामधील बीट लाहिया शहरावर झालेल्या इस्रायलच्या हल्ल्यात मृतांची संख्या 87 वर पोहोचली आहे. 40 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. दरम्यान, लेबनानमध्ये, इस्रायलने बैरूतमधील हिजबोलाच्या ठिकाणआंवर पुन्हा हवाई हल्ले सुरू केले.

**चकमक**
काश्मीर खोऱ्यात, बारामुल्ला जिल्ह्यातील उरी भागात नियंत्रण रेषेजवळ सैन्यासोबत झालेल्या चकमकीत एक सशस्त्र दहशतवादी मारला गेला. भारतीय लष्कर आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी परिसरात घुसखोरीविरोधी सुरू केलेल्या मोहिमेदरम्यान सैन्याच्या संयुक्त पथकानं दहशतवाद्यांना आव्हान दिलं, त्यानंतर झालेल्या गोळीबारात हा दहशतवादी मारला गेला.

**RCS - उडान वर्धापनदिन**
उडे देश का आम नागरिक या प्रादेशिक विमान संपर्क योजनेला काल आठ वर्षं पूर्ण झाली. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं 21 ऑक्टोबर 2016 ला ही योजना सुरू केली होती. UDAN योजनेत देशातील विमान सेवा नसलेल्या प्रदेशांमध्ये विमान मार्ग सुधारण्यावर आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे. ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत, 600 हून अधिक विमान मार्ग कार्यान्वित झाले आहेत. आणि एक कोटी ४४ लाखांहून अधिक प्रवाशांनी विमानांद्वारे प्रवास केला आहे. या योजनेखाली आतापर्यंत देशातील 34 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना जोडलं आहे. दोन हेलीपोर्ट्स व्यतिरिक्त ईशान्य प्रदेशात दहा विमानतळ देखील कार्यान्वित करण्यात आले आहेत. उडान योजना केवळ द्वितीय आणि तृतीय स्तरातील शहरांना संपर्क व्यवस्था प्रदान करत नाही तर पर्यटन क्षेत्रासाठी देखील एक प्रमुख सुविधा म्हणून सिद्ध झाली आहे. विमान संपर्क आणि प्रादेशिक वाढीला चालना देऊन ही योजना अनेक विमानतळांसाठी बदलाचा हुकुमी एक्का बनली आहे.

**ओडिशा**
ओडिशात पुढील वर्षी 8 ते 10 जानेवारी दरम्यान भुवनेश्वर इथं 18 व्या प्रवासी भारतीय दिवसाचं आयोजन केलं जाणार आहे. केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयानं यासंदर्भात पाठवलेल्या प्रस्तावाला राज्याचे मंत्री मोहन चरण माझी यांनी मंजुरी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, अनेक केंद्रीय मंत्री आणि ओडिशाचे मुख्यमंत्री यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**हॉकी**
हॉकीमध्ये, भारतीय कनिष्ठ पुरुष संघानं मलेशियातील सुलतान ऑफ जोहोर चषकाच्या गट-पातळीवर झालेल्या सामन्यात काल ग्रेट ब्रिटनचा 6-4 असा पराभव केला. भारताच्या दिलराज सिंग आणि शारदा नंद तिवारी यांनी प्रत्येकी दोन गोल केले तर अन्य गोल मोहम्मद कोनैन दाद आणि मनमीत सिंग यांनी केले.

**मॅरेथॉन**

काश्मीर खोऱ्यात श्रीनगरमध्ये काल पहिल्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पोलो व्ह्यू इथून मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवला. 42 किलोमीटर पूर्ण मॅरेथॉन आणि 21 किलोमीटर अर्ध मॅरेथॉनमध्ये देशभरातील सतराशेहून अधिक धावपटू आणि 12 परदेशातील खेळाडूंनी भाग घेतला. लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी मॅरेथॉनमधील विजेत्यांचा सत्कार केला. गेल्या काही वर्षांत विक्रमी संख्येनं पर्यटकांचं आगमन या भागातील शांतता, प्रगती आणि समृद्धीची साक्ष असल्याची भावना सिन्हा यांनी यावेळी व्यक्त केली.

**महिला-क्रिकेट**

महिलांच्या T20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, न्यूझीलंडनं सोफी डिव्हाईनच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेचा 32 धावांनी पराभव करून प्रथमच हा विश्वचषक जिंकला. दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर काल रात्री झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडनं दिलेल्या १५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेनं निर्धारित वीस षटकांत नऊ गडी गमावून १२६ धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडनं निर्धारित 20 षटकांत 5 बाद 158 धावा केल्या. अमेलिया केरला मालिकावीर आणि सामनावीर दोन्ही पुरस्कार घोषित करण्यात आले.

**हवामान**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं पुढील २४ तासांत पूर्व मध्य बंगालच्या उपसागरावर आणि उत्तर अंदमान समुद्रालगतच्या भागात कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तवला आहे. तमिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, केरळ आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात पुढील तीन दिवसांत मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसंच उद्या कर्नाटक आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

आयएमडीचे महासंचालक डॉक्टर मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितलं की, पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ बुधवारपर्यंत तयार होईल आणि गुरुवारी ओडिशा आणि पश्चिम बंगाल किनारपट्टीवर ताशी 100 ते 120 किलोमीटर वेगाने वाऱ्यासह धडकेल.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**